तो अध्याय करितां नित्य पठण । अपार धन लाभेल संसारी जाण । विजयलक्ष्मी पाठीं बैसून । करील हरण दरिद्र

Transliteration

Toh adhyaaya karitaa nitya pathanu | Apaara dhana laabhela samsaaree jaanu | Vijaya-Lakshmee paathee baisuunu | Kareela harana daridra ||

Ovee 106

तृतीय अध्यायीं मच्छिंद्र मारुती । युद्धा प्रवर्तले श्वेतक्षितीं । युद्ध करुनि उपरांतीं । ऐक्यचित्त झालें असे

Transliteration

Triteeya adhyaayee Machchindra Maarutee | Yuddhaa pravartale shvetakshitee | Yuddha karuni uparaantee | Aikyachitta jhaale ase ||

Ovee 107

याचें झालिया पठण । शत्रु होतील क्षीण । मुष्टिविद्यासाधन । तया होत सर्वथा

Transliteration

Yaache jhaaliyaa pathanu | Shatru hoteela ksheenu | Mushti-vidyaa-saadhanu | Tayaa hota sarvathaa ||

Ovee 108

मुष्टिबाधा झाली असोन । अपकार होईल तियेनें । मूर्तिमंत मारुती करोनि रक्षण । राहे तया घरीं सर्वदा

Transliteration

Mushti-baadhaa jhaalee asonu | Apakaara hoeela tiyene | Moortimanta Maarutee karoni rakshanu | Raahe tayaa gharee sarvadaa ||

Ovee 109

चतुर्थ अध्यायीं वदली कथा । अष्टभैरव चामुंडा समस्ता । रणीं जिंकूनि वसुसुता । ज्वालामुखी भेटली

Transliteration

Chaturtha adhyaayee vadalee kathaa | Ashta Bhairava Chaamundaa samastaa | Ranee jinkuuni vasusutaa | Jvaalaa-Mukhee bhetalee ||

Ovee 110

तो अध्याय नित्य पठण करितां । चुकेल कपटाची बंधनव्यथा । शत्रु पराभवोनि सर्वथा । निरंतर शांति मिरवेल

Transliteration

Toh adhyaaya nitya pathana karitaa | Chukela kapataachee bandhana-vyathaa | Shatru paraabhavoni sarvathaa | Nirantara shaanti miravelu ||

Ovee 111

पांचवे अध्यायींचें कथन । भूतें घेतलीं प्रसन्न करुन । अष्टपती जिंकून । विजयी झाला मच्छिंद्र

Transliteration

Paanchave adhyaayeenche kathanu | Bhoote ghetalee prasanna karunu | Ashtapatee jinkuunu | Vijayee jhaalaa Machchindru ||

Ovee 112

ती कथा नित्य करितां पठण । भूतसंचार नोहे त्या घराकारण । आलीं असतां जाती सोडून । परम त्रासेंकरोनियां

Transliteration

Tee kathaa nitya karitaa pathanu | Bhoota-sanchaara nohe tyaa gharaakaaranu | Aalee asataa jaatee soduunu | Parama traasen-karoniyaa ||

Ovee 113

सहाव्या अध्यायांत । शिवअस्त्र कालिका मच्छिंद्रनाथ । युद्ध करुनि प्रसन्नचित्त । वश्य झालीं अस्त्रें तीं

Transliteration

Sahaavyaa adhyaaya-atu | Shiva-astra Kaalikaa Machchindra Naathu | Yuddha karuni prasanna-chittu | Vashya jhaalee astre tee ||

Ovee 114

तो अध्याय नित्य करितां पठण । शत्रूलागीं पडेल मोहन । निष्कपट तो करुनि मन । किंकर होईल द्वारींचा

Transliteration

Toh adhyaaya nitya karitaa pathanu | Shatroo-laagee padela mohanu | Nishkapata toh karuni manu | Kinkara hoeela dvaareenchaa ||

Ovee 115

सातव्या अध्यायीं अपूर्व कथा । जिंकूनि वीरभद्र केली ऐक्यता । उपरी स्वर्गापासाव मच्छिंद्रनाथा । इच्छेसमान झालीसे

Transliteration

Saatavyaa adhyaayee apoorva kathaa | Jinkuuni Veerabhadra kelee aikyataa | Uparee svargaapaasaava Machchindra Naathaa | Ichchesamaana jhaaleese ||

Ovee 116

ती कथा नित्य गातां ऐकतां । लिप्त नोहे चौर्यायशींची व्यथा । झाली असेल मिटेल सर्वथा । चिंताव्यथा हरतील

Transliteration

Tee kathaa nitya gaataa aikataa | Lipta nohe chauryaayasheen-chee vyathaa | Jhaalee asela mitela sarvathaa | Chintaa-vyathaa harateelu ||

Ovee 117

जखीणभयापासुनी । त्वरित मुक्त होईल जनीं । एक मंडळ त्रिकालीं अभ्यासूनी । फळप्राप्ति घेइंजे

Transliteration

Jakheenabhayaapaasunee | Tvarita mukta hoeela janee | Eka mandala trikaalee abhyaasuunee | Phalapraapti gheinje ||

Ovee 118

आठवे अध्यायीं सकळ कथन । पाशुपतरायासी रामदर्शन । रणीं मित्रराज जिंकोन । केला प्रसन्न विद्येसी

Transliteration

Aathave adhyaayee sakala kathanu | Paashupata-raayaasee Raamadarshanu | Ranee mitraraaja jinkonu | Kelaa prasanna vidyesee ||

Ovee 119

तो अध्याय नित्य गातां ऐकतां । आपुला सखा देशावरता । तो गृहासी येऊनि भेटेल तत्त्वतां । चिंताव्यथा हरेल कीं

Transliteration

Toh adhyaaya nitya gaataa aikataa | Aapulaa sakhaa deshaavarataa | Toh grihaasee yeuuni bhetela tattvataa | Chintaa-vyathaa harela kee ||

Ovee 120

नववे अध्यायीं कथन । गोरक्षाचा होऊनि जन्म । उपरी सेवूनि बद्रिकाश्रम । विद्यार्णव झालासे

Transliteration

Navave adhyaayee kathanu | Gorakshaachaa houuni janmu | Uparee sevuuni Badrikaashramu | Vidyaa-arnava jhaalaase ||

Ovee 121

तो अध्याय नित्य गातां ऐकतां । साधेल विद्या इच्छिल्या अर्था । ब्रह्मज्ञान रसायण कविता । चौदा विद्या करोनि राहे

Transliteration

Toh adhyaaya nitya gaataa aikataa | Saadhela vidyaa ichchilyaa arthaa | Brahma-jnyaana rasaayana kavitaa | Chaudaa vidyaa karoni raahe ||

Ovee 122

दशम अध्यायींचे कथन । स्त्रीदेशीं मच्छिंद्रनंदन । अंजनीसुतअर्थी पाठवोन । अर्थ कीलोतळेचे पुरविले

Transliteration

Dashama adhyaayeenche kathanu | Streedeshee Machchindra-nandanu | Anjanee-suta-arthee paathavonu | Artha Keelotaleche puravile ||

Ovee 123

एकांती बैसूनि अनुष्ठान । संजीवनी पाठ करी गौरनंदन । गहिनीनाथाचा जन्म । कर्दमपुतळा करितां तो

Transliteration

Ekaantee baisuuni anushthaanu | Sanjeevanee paatha karee Gaura-nandanu | Gahinee-naathaachaa jalla-janmu | Kardama-putalaa karitaa toh ||

Ovee 124

तो अध्याय करितां पठण । स्त्रियांचे दोष जातील कपटपण । मुलें वांचतील होतां जाण । जगीं संतती मिरवेल

Transliteration

Toh adhyaaya karitaa pathanu | Striyaanche dosha jaateela kapatapanu | Baade (Mule) vaanchateela hotaa jaanu | Jagee santatee miravelu ||

Ovee 125

उपरी गृहद्रव्याच्या यज्ञांत । उदय पावला जालिंदरनाथ । तो एकादश अध्याय पठण करितां नित्य । अग्निपीडा होईना

Transliteration

Uparee grihadravya-achyaa yajnyaatu | Udaya paavalaa Jaalindaranaathu | Toh ekaadasha adhyaaya pathana karitaa nityu | Agni-peedaa hoeenaa ||

Ovee 126

आणि जयाचे धवळारांत । पूर्वीचा कांहीं दोष असत । तो जाऊनि संपत्तिविशेषातें । संततीसह भोगील कीं

Transliteration

Aani jayaache dhavalaa-raatu | Poorveenchaa kaanhee dosha asatu | Toh jaauuni sampatti-visheshaate | Santa-tee-saha bhogeela kee ||

Ovee 127

बाराव्यांत हें कथन । जालिंदरें गुरु केला अत्रिनंदन । उपरी कानिफाचा होऊनि जन्म । विटंबिलें देवासी

Transliteration

Baaraavyaanta hey kathanu | Jaalindare guru kelaa Atrinandanu | Uparee Kaaniphaachaa houuni janmu | Vitambile devaasee ||

Ovee 128

तो अध्याय करितां पठण । क्षोभ न पावे कोणी देवता जाण । क्षोभित असल्या होतील शमन । सुख सर्व त्याचि देती

Transliteration

Toh adhyaaya karitaa pathanu | Kshobha na paave konee devataa jaanu | Kshobhita asalyaa hoteela shamanu | Sukha sarva tyaachi detee ||

Ovee 129

तेराव्या अध्यायांत । मैनावतीतें प्रसन्न नाथ । होऊनि केलें अचल सनाथ । ब्रह्मरुपीं आगळी

Transliteration

Teraavyaa adhyaaya-atu | Mainaavateete prasanna Naathu | Houuni kele achala sanaathu | Brahma-rupee aagalee ||

Ovee 130

तरी तो अध्याय करितां पठण । स्त्रीहत्येचे दोष सघन । त्यांचें होऊनि सकळ निरसन । उद्धरील पूर्वजां

Transliteration

Taree toh adhyaaya karitaa pathanu | Stree-hatyeche dosha saghanu | Tyaanche houuni sakala nirasanu | Uddhareela poorvajaa Chaturdashu||

Ovee 131

चतुर्दश अध्यायीं कथन । गर्तेंत जालिंदर गोपीचंदानें । स्त्रीबोलें घातले नेऊन । गुप्त निशीमाझारी

Transliteration

Chaturdasha adhyaayee kathanu | Garteta Jaalindara Gopeechandaane | Streebole ghaatale neuunu | Gupta nishee-maajhaaree ||

Ovee 132

तो अध्याय पठण करितां । असेल बंद कारागृहीं व्यथा । तरी त्याची होईल मुक्तता । निर्दोष जनीं वर्तेल

Transliteration

Toh adhyaaya pathana karitaa | Asela banda kaaraa-grihee vyathaa | Taree tyaachee hoeela muktataa | Nirdosha janee vartelu ||

Ovee 133

पंचदशांत सुढाळ कथन । कानिफामारुतींचें युद्धकंदन । उपरी स्त्रीराज्यांत जाऊन । आतिथ्य पूर्ण भोगिलें

Transliteration

Pancha-dasha-anta sudhaala kathanu | Kaaniphaa-maaruteeche yuddha-kandanu | Uparee Streeraajya-anta jaauunu | Aatithya poorna bhogile ||

Ovee 134

तो अध्याय गातां ऐकता नित्य । घरचे दारचे कलह नित्यकृत्य । शांति पावोनि सर्व सुखांत । निर्भयपणें नांदेल

Transliteration

Toh adhyaaya gaataa aikataa nityu | Gharache daarache kalaha nitya-krityu | Shaanti paavoni sarva sukhaatu | Nirbhayapane naandela ||

Ovee 135

सोळावे अध्यायांत । कानिफा भेटला गोपीचंदातें । तरी तो अध्याय वाचितां नित्यानित्य । दुःस्वप्नांतें नाशील

Transliteration

Solaave adhyaaya-atu | Kaaniphaa bhetalaa Gopeechandaate | Taree toh adhyaaya vaachitaa nitya-anityu | Du-svapnaante naasheelu ||

Ovee 136

सप्तदश अध्यायीं कथन । जालिंदर काढिला गर्तेतून । उपरी नाथाची दीक्षा घेऊन । गोपीचंदें अर्चिला

Transliteration

Saptadasha adhyaayee kathanu | Jaalindara kaadhilaa garten-tuunu | Uparee naathaachee deekshaa gheuunu | Gopeechande archilaa ||

Ovee 137

तोचि अध्याय पठण करितां । योग साधेल आचरतां । दुष्टबुद्धि जाईल सर्वथा । सुपंथपंथा लागेल तो

Transliteration

Tochi adhyaaya pathana karitaa | Yoga saadhela yoga aacharataa | Dushta-buddhi jaaeela sarvathaa | Supantha-panthaa laagela toh ||

Ovee 138

अष्टादश अध्यायीं कथन । बद्रिकाश्रमीं गोपीचंद जाऊन । तपःपूर्ण भगिनी उठवोन । तीव्रपणीं आचरला

Transliteration

Ashtaa-dasha adhyaayee kathanu | Badrikaa Aashramee Gopeechanda jaauunu | Tapapoorna bhaginee uthavonu | Teevrapanee aacharalaa ||

Ovee 139

तो अध्याय नित्य पठण करितां । ब्रह्महत्या नासेल सर्वथा । पूर्वज कुंभीपाकीं असतां । सुटका होईल तयांची

Transliteration

Toh adhyaaya nitya pathana karitaa | Brahma-hatyaa naasela sarvathaa | Poorvaja Kumbhee-paakee asataa | Sutakaa hoeela tayaanchee ||

Ovee 140

एकोणिसाव्यांत गोरक्षाकारण । भेटला मारुती श्रीरामप्रीतीनें । तरी तो अध्याय करितां पठण । तया मोक्षार्थ साधेल कीं

Transliteration

Ekoni-saavyaata Gorakshaa-kaaranu | Bhetalaa Maarutee shree-Raama-preeteene | Taree toh adhyaaya karitaa pathanu | Tayaa moksha-artha saadhela kee ||

Ovee 141

विसाव्यांत अद्भुत कथन । श्रीमच्छिंद्रा भेटीचें कारण । गोरक्ष स्त्रीराज्यांत जाऊन । स्नेहसंपन्न जाहला

Transliteration

Visaavyaanta adbhuta kathanu | Shreemachchindraa bheteeche kaaranu | Goraksha Stree-raajyaanta jaauunu | Sneha-sampanna jaahalaa ||

Ovee 142

तो अध्याय पठण करितां गोड । लागलें असेल अत्यंत वेड । तरी ती चेष्टा जाऊनि धड । होऊनि प्रपंच आचरेल

Transliteration

Toh adhyaaya pathana karitaa godu | Laagale asela atyanta vedu | Taree tee cheshtaa jaauuni dhadu | Houuni prapancha aacharelu ||

Ovee 143

एकविसाव्यांत स्त्रीराज्यांतून । मच्छिंद्रासी काढिलें गोरक्षनंदने । नानापरी बोधूनि मन । दुष्टकर्मातें निवटिलें

Transliteration

Ekavisaa-vyaata Streeraajyaantuunu | Machchindraasee kaadhile Goraksha-nandane | Naanaa-paree bodhuuni manu | Dushta-karmaate nivatile ||

Ovee 144

तो अध्याय नित्य पठण करितां । नासेल बहुजन्मांची गोहत्या । निष्कलंक होऊनि चित्ता । तपोलोकीं मिरवेल

Transliteration

Toh nitya adhyaaya pathana karitaa | Naasela bahujanmaanchee go-hatyaa | Nishkalanka houuni chittaa | Tapo-lokee miravelu ||

Ovee 145

बाविसाव्यांत सोरटीग्रामीं । गोरक्षें मीननाथा मारोनी । पुन्हां उठविला मंत्रेंकरोनी । मच्छिंद्रमोहेंकरोनियां

Transliteration

Baavisaavyaata Sorateegraamee | Gorakshe Meena-naathaa maaronee | Punhaa uthavilaa mantrenkaronee | Machchindramohe-karoniyaa ||

Ovee 146

तरी तो अध्याय नित्य पठण करितां । पुत्रार्थिता पुत्र तत्त्वतां । तो होईल विद्यावंत । विद्वज्जनां मान्य कीं

Transliteration

Taree toh adhyaaya nitya pathana karitaa | Putra-arthitaa putra tattvataa | Toh hoeela vidyaanvantu | Vidvajjanaa maanya kee ||

Ovee 147

तेविसाव्यांत रसाळ कथन । मच्छिंद्र गोरक्ष गर्भाद्रीं जाऊन । सुवर्णविटेकरितां सुवर्ण । गर्भगिरी केला असे

Transliteration

Tevi-saavyaata rasaala kathanu | Machchindra Goraksha garbhaadree jaauunu | Suvarna-vite-karitaa suvarnu | Garbhagiree kelaa ase ||

Ovee 148

आणिक केला तेथें उत्सव । तरी तो अध्याय पठण नित्य भावें । करितां घरीं सुवर्ण नव । अखंड राहे भरोनी

Transliteration

Aanika kelaa tethe utsavu | Taree toh adhyaaya pathana nitya bhaave | Karitaa gharee suvarna navu | Akhanda raahe bharonee ||

Ovee 149

चौविसाव्यांत भर्तरीनाथ । जन्मोनि आला अवंतिकेंत । तरी तो अध्याय पठण करितां नित्य । बाळहत्या नासेल

Transliteration

Chauvi-saavyaanta Bhartaree-naathu | Janmoni aalaa avantiketu | Taree toh adhyaaya pathana karitaa nityu | Baala-hatyaa naaselu ||

Ovee 150

बाळहत्या जन्मांतरी । तेणें समस्त वांझ होती नारी । तरी ते नासेल संसारीं । सुखी होऊनि बाळ वांचे

Transliteration

Baala-hatyaa janma-antaree | Tene samasta vaanjha hotee naaree | Taree tey naasela samsaaree | Sukhee houuni baala vaanche ||

Ovee 151

पंचविसाव्यांत गंधर्व सुरोचन । रासभ झाला शापेंकरुन । तरी तो अध्याय केलिया पठण । शापवचन बाधेना

Transliteration

Pancha-visaavya-anta Gandharva surochanu | Raasabha jhaalaa shaapenkarunu | Taree toh adhyaaya keliyaa pathanu | Shaapa-vachana baadhenaa ||

Ovee 152

आणि मानवाविण दुसरा जन्म । होणार नाहीं तयाकारण । आरोग्य काया पतिव्रता कामिन । पुत्र गुणी होईल

Transliteration

Aani maanavaavina dusaraa janmu | Honaara naahee tayaa-kaaranu | Aarogya kaayaa pati-vrataa kaaminee | Putra gunee hoeelu ||

Ovee 153

सव्विसावे अध्यायांत । गणगंधर्व झाला विक्रमसुत । आणि विक्रम भर्तरीसुत एकचित्त । भेटी होऊनि राहिले

Transliteration

Savvisaave adhyaaya-antu | Ganagandharva jhaalaa Vikramasutu | Aani Vikrama Bhartareesuta ek-chittu | Bhetee houuni raahile ||

Ovee 154

तो अध्याय करितां पठण । गोत्रहत्या जाती नासून । पोटीं पाठीं शत्रुसंधान । न राहे होऊनियां

Transliteration

Toh adhyaaya karitaa pathanu | Gotra-hatyaa jaatee naasuunu | Potee paathee shatru-santhaanu (sandhaanu) | Na raahe houuniyaa ||

Ovee 155

सत्ताविसाव्यांत अद्भुत कथन । राज्यपदीं बैसला राव विक्रम । भर्तरी पिंगलेचें होऊनि लग्न । दत्तानुग्रह लाधला

Transliteration

Sattaavisaavya-ata adbhuta kathanu | Raajya-padee baisalaa raava Vikramu | Bhartaree Pingaleche houuni lagnu | Dattaa-anugraha laadhalaa ||

Ovee 156

तरी तो अध्याय करितां पठण । पदच्युत पावेल पूर्वस्थान । गेली वस्तु पुनः परतोन । सांपडेल तयाची

Transliteration

Taree toh adhyaaya karitaa pathanu | Padachyuta paavela poorva-sthaanu | Gelee vastu puna paratonu | Saampadela tayaanchee ||

Ovee 157

अठ्ठाविसाव्या अध्यायांत । पिंगलेकरितां स्मशानांत । विरक्त होऊनि भर्तरीनाथ । पूर्ण तप आचरला

Transliteration

Aththaavisaavyaa adhyaaya-atu | Pingalekaritaa smashaanaantu | Virakta houuni Bhartareenaathu | Poorna tapa aacharalaa ||

Ovee 158

तो अध्याय करितां श्रवण पठण । त्या भाविकाचें होईल लग्न । कांता लाभेल गुणवान । सदा रत सेवेसी

Transliteration

Toh adhyaaya karitaa shravana pathanu | Tyaa bhaavikaache hoeela lagnu | Kaantaa laabhela gunavaanu | Sadaa rata sevesee ||

Ovee 159

एकुणतिसावे अध्यायींचें चरित्र । भर्तरी होऊनि विरक्त पवित्र । गोरक्षा सांगती अत्रिपुत्र । गुरु नाथ पैं केला

Transliteration

Ekunati-saave adhyaayeenche charitru | Bhartaree houuni virakta pavitru | Gorakshaa saangatee Atriputru | Guru Naatha pai kelaa ||

Ovee 160

तो अध्याय नित्य करितां पठण । सुटेल क्षयरोगापासून । आणि त्रितापांची वार्ता जाण । कालत्रयीं घडेना

Transliteration

Toh adhyaaya nitya karitaa pathanu | Sutela kshaya-roga-paasuunu | Aani tri-taapaanchee vaartaa jaanu | Kaala-trayee ghadenaa ||

Ovee 161

तिसाव्या अध्यायांत । जन्मला चौरंगीनाथ । परी तें चरित्र पठण करितां । तस्करी दृष्टी बंधन होय

Transliteration

Tisaavyaa adhyaayaatu | Janmalaa Chaurangee-naathu | Paree tey charitra pathana karitaa | Taskaree drishtee bandhana hoyu ||

Ovee 162

एकतिसाव्यांत चौरंगीनाथ । तपा बैसला हिमालयांत । तरी तो अध्याय पढतां नित्य । कपटमंत्र न चालती

Transliteration

Eka-tisaavyata Chaurangee-naathu | Tapaa baisalaa himaalayaatu | Taree toh adhyaaya padhataa (nityu) | Kapatamantra na chaalatee ||

Ovee 163

बत्तिसाव्यांत सुगम कथन । मच्छिंद्र त्रिविक्रमदेहीं संचरोन । द्वादश वर्षें राज्य करोन । पुत्र दिधला रेवतीसी

Transliteration

Battisaavya-ata sugama kathanu | Machchindra Trivikrama-dehee sancharonu | Dvaadasha varshe raajya karonu | Revateesee putra didhalaa (Putra didhalaa revateesee) ||

Ovee 164

त्या अध्यायाचें करितां पठण । आयुष्य असतां देहाकारण । गंडांतरें करुं येतील विघ्नें । आपोआप टळतील कीं

Transliteration

Tyaa adhyaayaache karitaa pathanu | Aayushya asataa dehaa-kaaranu | Ganda-antare karu yeteela vighne | Aapo-aapa talateela kee ||

Ovee 165

तेहतिसाव्यांत गौरनंदन । वीरभद्राचा घेऊनि प्राण । मच्छिंद्रशव स्वर्गाहून । महीवरती उतरविलें

Transliteration

Tehati-saavyaata Gauranandanu | Veerabhadraachaa gheuuni praanu | Machchindra-shava svargaa-huunu | Mahee-varatee utaravile ||

Ovee 166

तरी ती कथा करितां पठण । धनुर्वाताचें निरसे विघ्न । झालेल्यातें होतां श्रवण । पीडा हरेल तयाची \|\|

Transliteration

Taree teey kathaa karitaa pathanu | Dhanur-vaataache nirase vighnu | Jhaale-lyaate hotaa shravanu | Peedaa harela tayaachee ||

Ovee 167

चौतिसाव्यांत रेवणजन्म । होऊनि भेटला अत्रिनंदन । सहज सिद्धिकळा दावून । गेला असें महाराजा \|\|

Transliteration

Chautisaavyaata Revana-janmu | Houuni bhetalaa Atri-nandanu | Sahaja siddhi-kalaa daavuunu | Gelaa asee Mahaaraajaa ||

Ovee 168

तरी ती कथा करितां पठण । जाणें कोणत्याही कार्याकारण । तो सिद्धार्थ साधेल कार्यसाधन । यश येऊनि येईल तो

Transliteration

Taree tee kathaa karitaa pathanu | Jaane konatyaahee kaaryaa-kaaranu | Toh siddhaartha saadhela kaarya-saadhanu | Yasha ke yeuuni yeeela toh ||

Ovee 169

पस्तिसाव्यांत पूर्ण कथन । रेवण झाला विद्यावान । दत्तकृपें स्वर्गीं जाऊन । बाळें आणिलीं विप्रांची

Transliteration

Pastisaavyaanta poorna kathanu | Revana jhaalaa vidyaavaanu | Datta-kripe svargee jaauunu | Baale aanilee vipraanchee ||

Ovee 170

तरी ती कथा करितां पठण । महासिद्ध येईल उदराकारण । बेचाळिसांचें करुनि उद्धारण । गातील आख्यान लोक परी

Transliteration

Taree tee kathaa karitaa pathanu | Mahaasiddha yeeela udaraa-kaaranu | Bechaalisaan-che karuni uddhaaranu | Gaateela aakhyaana loka paree ||

Ovee 171

छतिसाव्यांत अपूर्व कथा । जन्म झाला वटसिद्धनाथा । आस्तिक ऋषि झाला त्राता । तयाचियें मातेसी

Transliteration

Chatisaavyaanta apoorva kathaa | Janma jhaalaa Vata Siddha Naatha | Aastika rishi jhaalaa taataa | Tayaachiye maatesee ||

Ovee 172

ती कथा करितां श्रवण पठण । सर्पवृश्चिकदंश जयाकारण । झालिया विषाचें उत्तीर्ण । श्रवण केलिया अध्याय तो

Transliteration

Tee kathaa karitaa shravana pathanu | Sarpa-vrishchika-dansha jayaakaaranu | Jhaaliyaa vishaache utteernu | Shravana keliyaa adhyaaya toh ||

Ovee 173

सदतिसाव्या अध्यायांत । नागनाथासी गुरु झाला अत्रिसुत । उपरी विद्याबळें मच्छिंद्रनाथ । जिंकियेले भिडोनि

Transliteration

Sadatisaavyaa adhyaaya-atu | Naaga-naathaasee guru jhaalaa Atrisutu | Uparee vidyaa-bale Machchindra Naathu | Jinkiyele bhidoni ||

Ovee 174

तरी ती कथा करितां श्रवण पठण । सदना न लागे कुशीलपण । लाजल्या त्याचें होईल बंधन । विद्यावंत होउनियां

Transliteration

Taree tee kathaa karitaa shravana pathanu | Sadanaa na laage kusheelapanu | Laajalyaa tyaache hoeela bandhanu | Vidyaavanta houniyaa ||

Ovee 175

अडतिसाव्यांत चरपटीचा जन्म । होऊनि दत्तात्रेयें दीक्षा देऊन । विद्येमाजी करुनि संपन्न । तीर्थावळी धाडिला

Transliteration

Adatisaavyaanta charapateechaa janmu | Houuni Dattaatreye deekshaa deuunu | Vidyemaajee karuni sampannu | Teertha-avalee dhaadilaa ||

Ovee 176

तरी ती कथा सुरस । श्रवण पठण होतां त्यास । हिंवताप मधुरा नवज्वरास । शांति होईल सर्वस्वीं

Transliteration

Taree tee kathaa surasu | Shravana pathana hotaa tyaasu | Hiva-taapa madhuraa navajvaraasu | Shaanti hoeela sarvasvee ||

Ovee 177

एकुणचाळिसाव्यांत कथा । चरपटीनें जिंकिलें अमरनाथा । हरिहरादि देवां समस्तां । स्वर्गीं ख्याती लाविली

Transliteration

Ekunachaalisaavyaanta kathaa | Charapateene jinkile Amaranaathaa | Hariharaadi devaa samastaa | Svargee khyaatee laavilee ||

Ovee 178

तरी तो अध्याय करितां पठण । तो युद्धा जातां तपोघन । शस्त्रबाण पावोन । जय घेऊन येईल कीं

Transliteration

Taree toh adhyaaya karitaa pathanu | Toh yuddhaa jaataa tapoghanu | Shastra-baana paavonu | Jaya gheuuna yeeela kee ||

Ovee 179

यावरी चाळिसाव्यांत कथन । सर्व नाथांतें पाकशासन । स्वर्गीं नेऊनि करी हवन । विद्यार्थिरुपें अर्थ पुरविला

Transliteration

Yaavaree chaalisaa-vyaanta kathanu | Sarva naathaate Paakashaasanu | Svargee neuuni karee havanu | Vidyaarthee-rupe artha puravilaa ||

Ovee 180

तरी चाळिसावा नित्य पठण करितां । लाभेल सर्व इच्छिल्या अर्था । यश श्री ऐश्वर्य योग्यता । पुत्रपौत्रीं नांदेल

Transliteration

Taree chaalisaavaa nitya pathana karitaa | Laabhela sarva ichchilyaa arthaa | Yasha shree aishvarya yogyataa | Putra-pautree naandelu ||

Ovee 181

एकुणचाळिसांचा फलार्थ । तोचि प्राप्त तदर्थ । कीं चाळिसावा एक परिस । कीं कामधेनु कल्पतरु

Transliteration

Ekuna-chaalisaan-chaa phalaarthu | Tochi praapta tadarthu | Kee chaalisaavaa eka parisu | Kee Kaamadhenu Kalpataru ||

Ovee 182

गोरक्ष बोलतो वाचेकरुन । त्याचे असत्य मानील जन । जो निंदक यातें दावीं निंदून । तो अधिकारी विघ्नांचा

Transliteration

Goraksha bolato vaachekarunu | Tyaache asatya maaneela janu | Jo nindaka yaate daavee-le ninduunu | Toh adhikaaree vighnaanchaa ||

Ovee 183

इहलोकीं परलोकी । राहणार नाहीं परम सुखी । निर्वंश पावोनि शेवटीं वंशीं । पचेल ग्रंथ निंदितां हा

Transliteration

Ihalokee paralokee | Raahanaara naahee parama sukhee | Nirvansha paavoni shevatee vamshee | Pachela grantha ninditaa haa ||

Ovee 184

अगा हा ग्रंथ नोहे भक्तिसार । आहे गोरक्षाचा किमयागार । परी पालटोनि भाषांतर । महाराष्ट्र अक्षरीं रेखिला

Transliteration

Agaa haa grantha nohe Bhakti-saaru | Aahe Gorakshaachaa kimayaagaaru | Paree paalatoni bhaasha-antaru | Mahaaraashtra aksharee rekhilaa ||

Ovee 185

म्हणोनि श्रोते हो भाविक जन । सोडोनि द्या कीं निंदावचन । विश्वासापर स्वार होऊन । मोक्षमुक्काम करा कीं

Transliteration

Mhanoni shrote ho bhaavika janu | Sodoni dyaa kee nindaa-vachanu | Vishvaasaa-para svaara houunu | Moksha-mukkaama karee kee ||

Ovee 186

तरी हा ग्रंथ संग्रह करुन । चमत्कार पहावा पठण करुन । चाळीस प्रसंग मंत्रनिर्वाण । महासिद्धीचे असती कीं

Transliteration

Taree haa grantha sangraha karunu | Chamatkaara pahaavaa pathana karunu | Hey chaaleesa prasanga mantra-nirvaanu | Mahaa-siddhee-che asatee kee ||

Ovee 187

हे चाळीस मंत्र परोपकारी । आहेत दु:खाची करतील बोहरी । तरी संग्रह करुनि उगलेचि घरीं । ठेवा विश्वास धरुनियां

Transliteration

Hey chaaleesa mantra paropakaaree | Aaheta dukhaachee karateela boharee | Taree sangraha karuni ugalechi gharee | Thevaa vishvaasa dharuniyaa ||

Ovee 188

ह्या चाळीस अध्यायांत मंत्रतंत्र । सुखकारक असती अति पवित्र । दु:खदीसरिद्रहरण सर्वत्र । गोरक्षानें निर्मिलें

Transliteration

Hyaa chaaleesa adhyaaya-ata mantra-yantru | Sukha-kaaraka asatee ati pavitru | Dukha-daridra-harana sarvatru | Gorakshaane nirmile ||

Ovee 189

पठण करितां षण्मासमिती । जो अध्याय ज्या कार्याप्रती । तें कार्य होऊनि नि:संशय चित्तीं । पठण करुनि पहावें

Transliteration

Pathana karitaa shan-maasa-mitee | Jo adhyaaya jyaa kaaryaa-pratee | Tey kaarya houuni ni-sanshaya chittee | Pathana karuni pahaave ||

Ovee 190

याउपरी वाचितां न ये जरी । तरी संग्रह करुनि ठेवावा घरीं । नित्य वंदितां नमस्कारीं । कार्य त्यांतचि घडेल

Transliteration

Yaauparee vaachitaa na ye jaree | Taree sangraha karuni thevaa-vaagharee | Nitya vanditaa namaskaaree | Kaarya tyaatachi ghadela ||

Ovee 191

एक कुसुम झोंकूनि वरती । चला म्हणावें मम कार्याप्रती । नवनाथ वंदुनि उक्तीं । नमस्कार करावा

Transliteration

Eka kusuma jhonkuuni varatee | Chalaa mhanaave mama kaaryaa-pratee | Navanaatha vanduni uktee | Namaskaara karaavaa ||

Ovee 192

ऐसा याचा आहे मार्ग । करुनि पहावा चमत्कार चांग । नवनाथ ओडवोनि अंग । कार्य तुमचें करितील कीं

Transliteration

Aisaa yaachaa aahe maargu | Karuni pahaavaa chamatkaara chaangu | Navanaatha odavoni angu | Kaarya tumache kariteela kee ||

Ovee 193

तरी असो विजय संपत्ती । नांदो श्रोत्यांच्या गृहाप्रती । धुंडीसुत हेंचि प्रार्थी । मालू नरहरी देवांतें

Transliteration

Taree aso vijaya sampattee | Naando shrotyaachyaa grihaapratee | Dhundeesuta henchi praarthee | Maaloo Naraharee devaate ||

Ovee 194

शके सत्राशें एकेचाळीस । प्रमाथीनाम ज्येष्ठ मास । शुक्लपक्ष प्रतिपदेस । ग्रंथ समाप्त जाहला

Transliteration

Shake satraashe ekechaaleesu | Pramaatheenaama Jyeshtha maasu | Shuklapaksha pratipadesu | Grantha samaapta jaahalaa ||

Ovee 195

तरी ओंव्या सर्व नेमस्त । सप्तसहस्त्र सहाशत । उपरी ऐसे दैदीप्यवंत । ओंव्या मंत्र असती ह्या

Transliteration

Taree ovyaa sarva nemastu | Sapta-sahastra sahaa-shatu | Uparee aise daideepyavantu | Ovyaa mantra asatee hyaa ||

Ovee 196

अध्याय वाचावया न बनेल ज्यासी । तरी अध्यायातील एक ओंवीसी । पठण करुनि नाथनामासी । कार्यकाज करावें

Transliteration

Adhyaaya vaachaavayaa na banela jyaasee | Taree adhyaayaa-teela eka oveesee | Pathana karuni naatha-naamaasee | Kaarya-kaaja karaave ||

Ovee 197

असो आतां बहु भाव । श्रोते असोत चिरंजीव । इहलोकीं परलोकी ठेव । आनंदाची होतसे

Transliteration

Aso aataa bahu bhaavu | Shrote asota chiranjeevu | Ihalokee paralokee thevu | Aananda-achee hotase ||

Ovee 198

तरी समस्त नाथांतें धुंडीसुत । मालु नरहरि हेंचि विनवीत । कीं श्रोते असोत सुखरुपवंत । सर्व अर्थी सर्वदा

Transliteration

Taree samasta naathaante dhundeesutu | Maalu Narahari henchi vinaveetu | Kee shrote asota sukha-rupa-vantu | Sarva arthee sarvadaa ||

Ovee 199

स्वस्ति श्रीभक्तिकथासार । संमत गोरक्षकाव्य किमयागार । सदा परिसोत भाविक चतुर । चत्वारिंशतितमाध्याय गोड हा

Transliteration

Svasti Shreebhaktikathaa Saaru | Sammata Goraksha Kaavya Kimayaa-gaaru | Sadaa parisota bhaavika chaturu | Chatvaarinshatitamodhyaaya goda haa ||

श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ शुभं भवतु ॥

Shri Krishnarpanamastu | Shubham Bhavatu

॥ नवनाथभक्तिसार चत्वारिंशतितमोध्याय समाप्तः ॥

Navnath Bhaktisar Chatvaarinshatitamodhyaya Samaaptha ||

॥ श्रीनवनाथांचा श्लोक ॥

गोरक्षजालंदरचर्पटाश्च अड्भंगकानीफमच्छिंद्राद्याः । चौरंगिरेवाणकभर्त्रिसंज्ञा भूम्यां बभुवुर्नाथसिद्धाः ॥

Goraksha Jaalandara Charpataashcha Adbhanga Kaaneepha Machchindraadyaah | Chaurangi Revaanaka Bhartrisanjnyaa Bhoomyaam Babhuvurnaanaathasiddhaah ||

श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु ॥

Shri Guru Dattatreyarpanamastu